# जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.

## जुन्या फर्निचरचा फेर जाहीर लिलाव

जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कार्यालयाच्या जडवस्तू संग्रह नोंदवहीतील खालील वर्णनाचे जुने व मोडके फर्निचर जसे आहे व जेथे आहे या तत्वावर जाहीर लिलावाने दिनांक 02.11.2026 सोमवार रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव चे आवारात सकाळी 11.00 वाजता विकणे आहे. ज्या कोणाला सदरहू वर्णन केलेल्या फर्निचर घेण्यास स्वारस्य असेल त्यांनी पुढील शर्तीस अधिन राहून बोली बोलावयाची आहे.

1. संगणक चेअर 11 नग
2. लाकडी टेबल 01 नग.
3. लाकडी बाक 01 नग.
4. स्वेअर पाईप केन चेअर 03 नग
5. संगणक टेबल 03 नग
6. नादुरूस्त स्टॅपीलायझर 08 नग
7. लाकडी खुर्च्या 02 नग
8. टी–पॉय 01 नग.
9. लोखंडी पेटी 01 नग
10. पाण्याचे कुलर 02 नग
11. लाकडी कपाट 01 नग

## लिलाव विक्रीच्या शर्ती खालील प्रमाणे

1. वरील अनुसूचीत निर्दिष्ट केलेला तपशील न्यायालयाच्या संपूर्ण माहितीप्रमाणे दिलेला आहे. तथापि, या उद्घोषणेतील कोणत्याही चुकीबद्दल व चुकीच्या तपशीलाबद्दल हे न्यायालय जबाबदार राहणार नाही. फर्निचरची संख्या कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

2. लिलावाची बोली कोणत्या रक्कमेने वाढवावयाची ते विकीचे काम चालविणा–या अधिका–याकडून ठरविण्यात येईल. लिलाव किती रक्कमेस मागितला किंवा कोणी मागितला याबाबत काही वाद उपस्थित झाल्यास संबंधित गटांचे ताबडतोब पुन्हा लिलाव केले जातील.

3. जो कोणी कोणत्याही गटाची सर्वात जास्त किंमत देऊ करेल त्याला त्या गटाचा खरेदीदार ठरविण्यात येईल. मात्र नेहमी असे समजावे की, तो बोलीदार लिलाव मागण्यास कायदेशीर रितीने सक्षम असला पाहिजे. आणखी पुढे असे ठरविण्यात येते की, सर्वात जास्त किंमतीच्या बोलीत देऊ काढलेली किंमत जेव्हा स्पष्टपणे इतकी अपूरी असल्याचे दिसून येईल की, ती बोली नाकारणे योग्य होईल, तेव्हा विक्रीचे काम चालविणारे अधिकारी हे त्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार ती बोली नाकारु शकतील.

4. विक्रीचे काम चालविणा–या अधिका–याला आवश्यक वाटल्यास तो लिलाव स्थगित करण्याची कारणे नमुद करुन विक्रीचे काम स्थगित करु शकतो.

5. प्रत्येक गटाची किंमत विक्रीच्या वेळी अगर त्यानंतर विक्रीचे काम चालविणारे अधिकारी फर्माविल त्यावेळी दिली पाहिजे. व त्यात कसूर झाल्यास उक्त मालमत्तेचा ताबडतोब पुन्हा लिलाव केला जाईल. व अशा दुस–या लिलावाच्या वेळी जर सदर गटाची किंमत कमी आली, तर मूळ लिलावाच्या वेळी पैसे भरण्यास कसूर करणा–या व्यक्तीकडून विक्रीतील तुटीची रक्कम वसुल केली जाईल व ती तशी वसुल न झाल्यास ती रक्कम सदर व्यक्तीची मालमत्ता जप्त करुन वसूल केली जाईल.

6. विक्री झालेले फर्निचर घेणा–यास त्याचे स्वखर्चाने त्वरीत घेवून जावे लागेल.

22/10/2026

जिल्हा न्यायाधीश–4 व
अति. सत्र न्यायाधीश,
जळगांव.

म.जा.क. रोखशाखा/५४५४/2026
जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.
दिनांक :– 21/10/2026

<u>प्रत माहिती व नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्याकरिता</u>..

1. म.जिल्हाधिकारी, जळगांव.
2. म.तहसिलदार, जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, जळगांव.
4. म.जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.
5. म.मुख्य न्यायदंडाधिकारी, जळगांव.
6. म.कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जळगांव.
7. म.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव.
8. म.आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.
9. जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर.